शेतकरी आत्महत्या प्रकरणी केंद्र शासन व राज्य शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजसच्या अंमलबजावणीचे मुल्यमापन करण्यासाठी नेमलेल्या डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांकः-.एससीवाय-२००९/प्र.क्र.१६/म-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक २०/२/२००९.

पहाः- १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.एससीवाय-२००७/प्र.क्र.३२८/म-७, दिनांक १३/११/२००७.

**प्रस्तावनाः-** शासनाने राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन त्यावर नियंत्रण आणण्यासाठी डिसेंबर, २००५ मध्ये रु.१०७५ कोटीचे पॅकेज जाहीर केले होते. तसेच जुलै, २००६ मध्ये मा.पंतप्रधानानी रु.३७५० कोटीचे एक स्वतंत्र पॅकेज घोषित केले होते. सदर दोन्ही पॅकेजसची अंमलबजावणी ३ वर्षात करावयाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. केंद्र व राज्य शासनाच्या पॅकेजेसच्या अंमलबजावणीचे मुल्यमापन करण्यासाठी राज्य शासनाने शासन निर्णय, क्र.एससीवाय-२००७/प्र.क्र.३२८/म-७, दिनांक १३/११/२००७ अन्वये पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.नरेंद्र जाधव यांची एक सदस्यीय समिती नेमली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल दिनांक २७ जुलै, २००८ रोजी शासनास सादर केला. समितीचा अहवाल दिनांक ५.८.२००८ रोजी मंत्रिमंडळास सादर करण्यात आला. समितीने अहवालात समग्र महाराष्ट्र समतोल कृषीविकास कृती योजना आखावी व कृषक संजीवनी अभियान राबविण्याची शिफारस केली होती.

**शासन निर्णय**

डॉ.नरेंद्र जाधव यांनी केलेल्या दोन योजनांअंतर्गत ज्या उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या, त्या अनुषंगाने केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल /उपाययोजना संदर्भात शासनाने खालील निर्णय घेतले आहेत :-

१) समितीच्या अहवालातील १३ शिफारसींच्या बाबतीतील कार्यपूर्ती अहवाल सोबत परिशिष्ट ' अ ' नुसार मान्य करण्यात येत आहे.

२) समितीच्या अहवालातील क्रमांक ६ व ९ येथील शिफारसींबाबत स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्याचे आदेश संबंधित विभागांना देण्यात आले आहेत व क्रमांक ७ च्या शिफारसी संदर्भात केंद्र शासनामार्फत कायदा बनविण्याची आवश्यकता आहे.

३) तसेच समितीच्या तीन शिफारशींवर खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:- GB
आवक नं. ३१५१
- 2 MAR 2009
विशेष नोंद
कार्य विवरण नं.
प्र.लि.

अ) **कृषी विभाग**:- समितीने शिफारस केल्यानुसार मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विभागीय समिती (इंटर मिनीस्टेरीएल) तसेच राज्य स्तरावर मा.कृषी मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र कृषी विकास परिषद आणि जिल्हा स्तरावर आढावा घेण्यासाठी जिल्हा कृषी विकास समिती स्थापन करावी.

ब) **शिक्षण विभाग** :- विदर्भातील अत्यंत अडचणीत असलेल्या ४,३४,२९१ शेतकरी कुटूंबांचे पुनःसर्व्हेक्षण करुन त्यांच्या कुटूंबातील सर्व विद्यार्थ्यांना शासकीय दरानुसार इयत्ता पहिली ते बारावी पर्यन्त शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण प्रवेश व शैक्षणिक शुल्काचा परतावा व सदर विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.५००/-



Received on 1/4/09 M Dipale GB-S

GNCL020901

वार्षिक त्यांना वहया, पुस्तके व इतर किरकोळ खर्चापोटी देण्यात येईल. तसेच त्या विद्यार्थ्यांपैकी इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षेला बसणा-या विद्यार्थ्यांस शासकीय दरानुसार संपूर्ण परीक्षा शूल्क माफ करण्यात यावे. त्यांच्यासाठी रु.२६ कोटी १६ लाख निधीची तरतूद करण्यात यावी.

क) आरोग्य सुविधा :- सन २००६ मध्ये झालेल्या सर्व्हेक्षणामध्ये गंभीर आजार आढळलेले ९२,२८१ शेतक-यांचे आरोग्य खात्यामार्फत वैद्यकीय तपासणी व सर्व्हेक्षण तातडीने पूर्ण करुन सर्व्हेक्षणाअंती सुयोग्य योजनेद्वारे त्यांना विनामुल्य उपचार करण्याबाबत कार्यवाही करावी.

या व्यतिरिक्त मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती नेमून अहवालातील स्विकृत झालेल्या शिफारशींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कालबध्द कार्यक्रम व कार्यपध्दती आखण्यास व अनुपालन विहीत मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने योग्य संनियंत्रण करण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

प्रशासनातील संबंधित विभागांना मान्य केलेल्या शिफारसींची त्वरित अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( जि. शां. वाणी )
शासनाचे कक्ष अधिकारी,

प्रति,

१) मा.मुख्यमंत्र्यांचे व मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) डॉ.नरेंद्र जाधव, कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे.
४) मा.मुख्य सचिव यांचे सचिव
५) अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग,मंत्रालय, मुंबई-३२
६) प्रधान सचिव(सहकार/पणन/जलसंपदा/ऊर्जा/अन्न व नागरी पुरवठा/नियोजन(रोहयो)/ कृषी/पशुसंवर्धन/ महिला व बालकल्याण/ वस्त्रोद्योग/वित्त/शालेय शिक्षण/सार्वजनिक आरोग्य, मंत्रालय, मुंबई-३२.
७) सर्व विभागीय आयुक्त.
८) सर्व जिल्हाधिकारी.
९) महासंचालक, वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, अमरावती.
१०) प्रधान सचिव(म. व पु.) यांचे स्वीय सहायक.
११) निवड नस्ती.

शासन निर्णय क्रमांकः-.एससीवाय-२००९/प्र.क्र.१६/म-७,दिनांक २०/२/२००९
सोबतचे परिशिष्ट 'अ'

| अ. क्र | विभाग | बाबी | निर्णय/शेरा |
| --- | --- | --- | --- |
| १ | सहकार | १) पतपुरवठा:-<br>अ) सुधारीत OTS योजनेची व्याप्ती वाढवून महाराष्ट्रातील वगळलेल्या ७ जिल्ह्यांचा समावेश करणे.<br>ब) ग्रामीण वित्त पुरवठा संस्थांचे पुनर्गठन. | अ) रु.१४१ कोटीची पूरक मागणी मान्य करण्यात आली आहे.<br>ब) वैद्यनाथन समितीची अहवाल स्विकारुन ग्रामीण पतसंस्था बळकट करण्यासाठी ८००० विविध कार्यकारी संस्थांना रु.८५० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. नाबार्ड व आरबीआयच्या सूचनेनुसार अधिक कार्यक्षमरित्या व स्वायत्तेसह चालवावी. |
| २ | पणन | दलालमुक्त कृषी उत्पन्न बाजार समितीची निर्मिती | एपीएमसी कायद्यामध्ये सुधारण करण्यात आली असून त्या अंतर्गत मागील एक वर्षात सरल विक्री व्यवस्थेद्वारे रु.१००० कोटीचे कृषी उत्पन्न शेतक-यांकडून खरेदी करण्यात आले आहे.थेट खरेदीसाठी ४९ अनुज्ञप्त्याही देण्यात आल्या आहेत. |
| ३ | पणन | ग्रामीण गोदाम व कोल्ड स्टोअरेज निर्मिती. | राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत १००० गोदामांच्या दुरुस्तीसाठी रु.२० कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. या शिवाय रु. १२ लक्ष टन क्षमतेचे ३००० गोदाम नाबार्डच्या सहाय्याने स्थापीत केले आहे. |
| ४ | सहकार | सावकारी कर्जाची पर्यायी व्यवस्था. | बँकामार्फत २ लाखापेक्षा जास्त स्वयंसहाय्यता गट स्थापीत करुन त्यांच्या मार्फत कर्ज पुरवठा करण्यात येत आहे. त्या योजनेची व्याप्ती वाढवून हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. |
| ५ | जलसंपदा | सिंचन सुविधा, विदर्भातील सिंचनाचे अनुशेष दूर करणे. | मार्च,२००२ अखेर राज्यामध्ये एकूण रु.५५०१ कोटी इतका अनुशेष होता. त्यापैकी विदर्भामध्ये रु.३४२२ कोटी इतका अनुशेष होता. यापैकी रु.१२२६ कोटी खर्च करण्यात आले आहेत व यातून ४.४६ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. आता मार्च, २००८ अखेर विदर्भामध्ये रु.२१९६ कोटी इतका अनुशेष शिल्लक आहे. सदर आर्थिक अनुशेष सन २०१०-११ अखेर व भौतीक अनुशेष सन २०११-१२ अखेर निर्मुलनाचे नियोजन करण्यात आले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ऊर्जा | वीज पुरवठा, विदर्भातील कृषी पंपाच्या जोडणीची अनुशेष दूर करणे | दि.१.४.१९९६ ला विदर्भ विभागाचा कृषी पंपाचा अनुशेष १.७ लक्ष इतका होता. त्यापैकी नोव्हेंबर,२००८ अखेर ९९८८८ पंपाना वीज पुरवठा केलेला आहे. उर्वरीत ७१५८४ इतका अनुशेष असून १७३९२ अर्ज प्राप्त झालेले आहेत. सदर अर्जदारांना तातडीने वीज पुरवठा व्हावा यासाठी रु.३०९.६४ कोटीची निविदा पूर्ण करुन प्रत्यक्षात कामे सुरु झालेली आहे. अनुशेष तातडीने दुरं करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. |
| ७ | महसूल | भूमी अभिलेख सुधार. | अनेक सदस्यांनी नोंदणी एकाच ७/१२ वर असून ती नावे वेगळी करणे ही शिफारसी स्वीकृत करण्यात आली आणि त्याप्रमाणे भूधारण नकाशेसुध्दा वेगळे करण्याची कार्यवाही करण्यासाठी निर्णय झालेला आहे. यामुळे शेतक-यांना विविध विकास योजनांचा लाभ उपलब्ध होण्यास सुविधा होईल. |
| ८ | अन्न व नागरी पुरवठा | अत्यंत अडचणीत असलेल्या शेतक-यांना अंत्योदय योजनेत समाविष्ट करणे. | अत्यंत अडचणीत असलेल्या ४,३४,२९१ शेतकरी कुटूंबापैकी २४६३३ शेतकरी कुटूंब अंत्योदय योजनेखाली लाभ घेत असून उरलेल्या कुटूंबांना अंत्योदय योजनेचा सवलतीच्या दराने फायदा (प्रती महिलर ३५ किलो धान्य) देण्यासांठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| ९ | कृषी | दर्जेदार किटकनाशक पुरवठा | समितीने दिलेल्या या शिफारशीबाबत अंमलबजावणी करण्यात येईल. |
| १० | कृषी | विदर्भासाठी विशेष कॅाटन मिशन. | महाराष्ट्रातील इतर कापूस क्षेत्रासाठी केंद्र शासनाचे कॅाटन मिशन कार्यरत आहेत. या कार्यक्रमा अंतर्गत बाबीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. |
| ११ | नियोजन (रोहयो) | विस्तारित रोजगार हमी योजना. | अ) **<u>मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन</u>**:- पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर जिल्हयातील १४०५ मालगुजारी तलाव दुरुस्तीचा कार्यक्रम राज्य सरकारच्या जिल्हा परिषद (लघुपाटबंधारे), जलसंधारण(लघुपाटबंधारे) व पाटबंधारे विभाग इ. यंत्रणांना एकत्र आणून त्याची अंमलबजावणी पूर्ण करण्यात यावी व त्यासाठी रु. ५० कोटीची तरतूद करण्यात यावी. भात शेतीसाठी बोडी दुरुस्तीचा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | कार्यक्रम राबविण्यात येऊन पुढील दीड वर्षाच्या कालावधीत ६५०० बोडी पूर्ण करण्यात यावी व त्यासाठी रु. ५० कोटीची तरतूद करण्यात यावी. तसेच पूर्व विदर्भातील जिल्हयांत १२४३ शॅलो ट्यूबवेल घेण्याचा कार्यक्रम राबवावा. भात शेतीसाठी जलसिंचनाची उपलब्धता वाढविण्यात यावी व त्यासाठी १०० कोटीची तरतूद करावी.<br>**ब) विहीरींची धडक मोहिम:-** विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ व वर्धा या सहा जिल्हयांत रोहयो अंतर्गत सिंचन विहीरींचा धडक कार्यक्रम प्रत्येक तालुक्यात १००० याप्रमाणे एकूण ६४.००० विहीरींचा धडक कार्यक्रम सुरु करण्यात आला आहे. सिंचनाचा फायदा आपद्ग्रस्त शेतक-यांना तातडीने उपलब्ध व्हावा. म्हणून सदरचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. आता वरील सहा जिल्हयांतील प्रत्येक तालुक्याला अतिरिक्त ३०० धडक सिंचन विहीरींचा लक्षांक मंजूर करण्यात येत आहे. त्यानुसार एकूण ६ जिल्हयांतील ६४ तालुक्यात मिळून अतिरिक्त १९,२०० विहीरी घेण्यात याव्या. प्रत्येक विहीरीस रु.१.०० लक्ष याप्रमाणे एकूण रु.१९२.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च राज्य रोहयो निधीतून करावा. |
| १२ | पशुसंवर्धन | स्वस्त पशुखाद्य पुरवठा. | शिफारशींची कार्यपूर्तता झालेली आहे. सहा महिन्यांचे पशुखाद्य उपलब्ध करुन देण्यात येत आहे. |
| १३ | महिला व बालकल्याण | विवाह अनुदान. | राज्यातील सर्व जिल्हयात शेतकरी/ शेतमजुर यांच्या मुलींच्या विवाहासाठी शुभमंगल सामुहिक विवाह योजना राबविण्यात येत आहे. |

**शासन निर्णय क्रमांक:-.एससीवाय-२००९/प्र.क्र.१६/म-७,दिनांक २०/२/२००९ सोबतचे परिशिष्ट 'ब'**

| अ.क्र | विभाग | अहवालातील योजना/शिफारस | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सहकार | पतपुरवठा:२००७-०८ च्या हंगामात वाटप करण्यात आलेल्या आणि थकित झालेले खर्चाचे पुन:गठन. | नाबार्डने नामंजूर केला आहे. |
| २ | | कृषी कर्ज आखणी | सध्याच्या व्यवस्था पुरेशी आहे. |
| ३ | | दलाल मुक्त कृषी उत्पन्न बाजार व्यवस्था निर्मिती. | RKVY अंतर्गत विचाराधीन आहे. |
| ४ | कृषी | शेती मालाचा वाजवी भाव | केंद्र शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. |
| | | पीक पध्दती | सध्याची पीक पध्दत समाधानकारक आहे. |
| ५ | पशुसंवर्धन | जोडधंदा म्हणून उत्पादित दुधाची प्रक्रिया संयंत्रे उभारणे. | अधिक पायाभूत सुविधा उभ्या करण्याची आवश्यकता नाही. |
| ६ | वस्त्रोद्योग | सुयोग्य तंत्रज्ञान; वितरण व पणन व्यवस्था: सहकारी तत्वावर मोठ्या सुतगिरण्या प्रस्तावित कराव्यात | याबाबत स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्यात यावा. |
| ७ | कृषी | अनुदानीत दर्जेदार पुरवठा योजना | याबाबत केंद्र शासनाकडुन कायदा बनविणे आवश्यक आहे. |
| ८ | कृषी | सुधारित पिक विमा योजना | सध्या प्रचलित असलेली योजना पुरेशी आहे. |
| ९ | कृषी | प्रमुख पिक रोगावर शासकीय औषधोपचार | सध्या प्रचलित असलेली योजना पुरेशी आहे व सक्तीचे करण्याबाबत विभागाने स्वतंत्र प्रस्ताव तयार करावा. |
| १० | कृषी | १०० % विमा समाविष्ठता | सध्या प्रचलित असलेली योजनेतून लाभ देण्याबाबत प्रयत्न करण्यात येईल. |
| ११ | नियोजन (रोहयो) | विस्तारित रोजगार हमी योजना: शेती कामाच्या मजुरांची गरज पडल्यास रोहयोअंतर्गत मजूर पुरवठा करण्यात यावा. | व्यवहार्य नाही. |

..........